# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्र.६ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ (निकाल विभाग)

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com


जा. क्र. गों.वि./निकाल./३४० ./२०२१

दिनांक: २९/०१ /२०२१

## अधिसुचना

**महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजन करण्याबाबत.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्य तथा संबंधिताना कळविण्यात येते की, विद्यापीठाचा आठवा दीक्षांत समारंभ दिनांक २८/०१/२०२१ रोजी आभासी पध्दतीने संपन्न झालेला असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ चा एकरूप परिनियम क्र. ४/२०१८ नुसार विद्यापीठाने आयोजीत केलेल्या दीक्षांत समारंभानंतर एका महिण्याच्या आत संबंधीत सर्व महाविद्यालयांनी महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजीत करावयाचे आहे. त्याबाबतची मार्गदर्शक तत्वे संलग्नीत करण्यात आलेले असून त्यानुसार पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ घेण्यात यावे.

**सहपत्र:–** महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजनाबाबतचे मार्गदर्शक तत्वे.

29.1.2021

**(डॉ. अनिल झेड. चिताडे)**
**संचालक**
**परीक्षा व मुल्यमापन मंडळ**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

प्रतिलिपी:–

१) मा. कुलगरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
२) मा. प्र. कुलगरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
३) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजनाबाबत

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ (२०१७ चा महा ६) यांच्या कलम ७२ च्या पोट कलम (१०) तसेच कलम १३० द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने दीक्षांत समारंभाच्या संबंधात २०१८ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ विहीत केलेला आहे. महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग चार–ब मधिल मुद्दा क्र. ८ नूसार विद्यापीठाने आयोजीत केलेल्या दीक्षांत समारंभानंतर एका महिण्याच्या आत संलग्न महाविद्यालया कडुन अथवा मान्यता प्राप्त परीसंस्थे कडुन पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजीत करण्यात येईल असे नमूद आहे. त्यानुसार महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ खालील मार्गदर्शक तत्वा प्रमाणे आयोजीत करावा.

- विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभा नंतर एका महिन्याच्या आत महाविद्यालयांनी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजीत करण्यात यावा.
- पदवी प्रमाणपत्रे महाविद्यालय स्तरावरुन विद्यार्थ्यांना वितरीत करण्याची व्यवस्था संबधीत महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी करावे.
- पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभा नंतर महाविद्यालयाला एकत्रित पणे प्राचार्यांनी अधिकृत केलेल्या विशेष दुता कडे विद्यापीठा कडून हस्तांतरीत करण्यात येतील.
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी शिक्षण क्षेत्राशी निगडीत असावी.
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ हा स्वतंत्र अथवा महाविद्यालयात होणाऱ्या इतर शैक्षणिक कार्यक्रमासोबत घेण्यात यावा.
- महाविद्यालयामार्फत पात्र विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आटोपल्यानंतर त्या तारखेपासून पंधरा (१५) दिवसाचे आत संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, यांना छायाचित्रासह सविस्तर अहवाल सादर करावा.
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ सुरु होण्यापूर्वी विद्यापीठ गीत व समारंभ आटोपल्यानंतर राष्ट्रगीत घेणे बंधनकारक राहील.
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाकरीता येणारा खर्च संबंधीत महाविद्यालयांनी करावयाचा आहे.
- विद्यापीठाचा केंद्रबिंदु विद्यार्थी असल्याने सदर उपक्रम हा विद्यार्थ्यांच्या हिताचा व सन्मानाच्या दृष्टीने घेण्यात येणार असल्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाने पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजीत करणे अनिवार्य आहे.
- कार्यक्रम स्थळी कोव्हीड–२०१९ च्या पार्श्वभुमीवर राज्य व केंद्र शासनाच्या सुचनाचे तंतोतंत पालन करावे.

29.1.2021

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली